ePaper
‘ससून’च्या अहवालावरून सुप्रिया सुळे संतापल्या



| वर्ष - 8 | अंक - 263 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

**आतील पानांत**

- वैभव सूर्यवंशी बाद होताच रडला!
- इशांत शर्मा आशुतोष शर्मावर संतापला
- द्विपक्षीय सहकार्यास प्रचंड वाव!
- तर मराठी माणसावर उपकार होतील!

www.mahaenews.com | रविवार, दि. 20 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राजची टाळी, उध्दव ठाकरेंचीही सशर्त टाळी

# राज-उद्धव एकत्र येणार?

## आमच्यातील वाद, भांडणं किरकोळ आहेत : राज ठाकरे

**। मुंबई / पुणे / बीड । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीबाबत राज्याच्या राजकारणात आज जोरदार चर्चा रंगल्या आहेत. या चर्चां मागचं कारण म्हणजे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत बोलताना शिवसेना ठाकरे गटाच्या युतीबाबत मोठं भाष्य केलं. ‘मराठी माणसांच्या अस्तित्वासाठी आमच्यातील वाद, भांडणं किरकोळ आहेत, एकत्र येणं, एकत्र राहणं यात फार कठीण नाही’ असं सांगत राज ठाकरे यांनी थेट ठाकरे गटाबरोबर युतीचे संकेतच दिले. त्यामुळे यावर उद्धव ठाकरे काय भूमिका घेणार? याबाबत लक्ष लागलेलं असतानाच उद्धव ठाकरे यांनीही आजच प्रतिक्रिया दिली.**

आपण देखील किरकोळ भांडणं बाजूला ठेवायला तयार असल्याची भूमिका मांडत एक प्रकारे उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांना प्रतिसाद दिला. त्यामुळे मनसे आणि ठाकरे गट एकत्र येणार असल्याच्या चर्चा राज्याच्या राजकारणात रंगल्या. दरम्यान, मनसे आणि ठाकरे गटाच्या युतीच्या चर्चांवर राज्यातील अनेक नेत्यांनी आपली भूमिका मांडत प्रतिक्रिया दिली.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत, शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते संजय शिरसाट, ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे, मनसेचे नेते संदीप देशपांडे यांच्यासह आदी नेत्यांनी भूमिका मांडली.

### फडणवीस काय म्हणाले?

मराठीच्या मुद्दांवर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीची चर्चा सुरु असल्याचा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारला. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, “दोन्ही ठाकरे जर एकत्र आले तर आम्हाला आनंदच आहे. कोणीही आपल्यातील मतभेद विसरून एकत्र येत असेल तर यामध्ये काहीही वाईट वाटण्याचं कारण नाही. दोन्ही ठाकरे एकत्र आले तर आम्ही स्वागत करू”, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.



### राऊत काय म्हणाले?

“भारतीय जनता पक्षाला ठाकरे हे नाव नष्ट करायचं आहे. अशावेळी जर दोन्ही ठाकरेंनी साद आणि प्रतिसाद ही भूमिका घेतली असेल तर महाराष्ट्र स्वागत करेल. आम्ही आता उद्धव ठाकरे यांनी भूमिका मांडल्यानंतर प्रतिक्षा करणार आहोत. आम्ही नक्कीच सकारात्मक भूमिकेतून या सगळ्या गोष्टींकडे पाहत आहोत. शेवटी महाराष्ट्राच्या कल्याणाचा विषय आहे”, असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

### पवार काय म्हणाले?

“मनसे अध्यक्ष म्हणून राज ठाकरे हे स्वत: त्यांच्या पक्षाचं काम करतात. तसेच शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख म्हणून उद्धव ठाकरे हे काम करतात. त्यामुळे त्यांनी त्यांच्या दोन्ही पक्षाबाबत काय भूमिका घ्यावी हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. मात्र, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावं की नाही यावं? हे आम्ही दुसऱ्या कोणत्या राजकीय पक्षांने सांगण्याचं काही कारण नाही. माझं मत एवढंच आहे की प्रत्येकाने आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून जे जे त्यांना योग्य वाटतं तो निर्णय त्यांनी घ्यावा”, असं अजित पवार म्हटलं.

### अंधारे काय म्हणाल्या?

“महाराष्ट्राच्या हितापुढे कोणाच्याही महत्वकांक्षा एवढ्या महत्वाच्या नाहीत, हे राज ठाकरे यांनी केलेलं विधान मला पटलं. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे भाऊ-भाऊ आहेत. त्यांनी कुटुंब म्हणून एकत्र राहिलंच पाहिजे. पाण्यात काठी मारल्याने पाणी कधी वेगळं होत नाही. असं मानणाऱ्यांपैकी मी आहे. मात्र, या दोघांचं राजकारण एकत्र असलं पाहिजे का? यावर नक्कीच चर्चा होऊ शकते. महाराष्ट्राच्या अस्तित्वासाठी आणि हितासाठी जर दोन्ही भाऊ एकत्र पण ते एकत्रित येणं ज्या भाजपाने महाराष्ट्राची अस्मिता पायदळी तुडवण्याचं राजकारण केलं.

## अशी अभद्र युती होऊ नये

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने राज्यात नव्या राजकीय समीकरणाच्या चर्चेला सुरुवात झाली आहे. राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत उद्धव ठाकरे यांच्याबरोबर युती करण्याचा प्रस्ताव समोर ठेवला आहे. महाराष्ट्राच्या हितापुढे मी माझा इगो पाहत नाही, असं म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंना युतीसाठी निमंत्रणच दिले. राज ठाकरेंच्या या प्रस्तावावर उद्धव ठाकरेंनीही प्रतिक्रिया दिली असून युती केल्यानंतर कोणालाही लपून छपून भेटणार नसाल तर मीही हे भांडण विसरायला तयार आहे, असं त्यांनी जाहीर सभेत सांगितलं. दरम्यान, या युतीवरून अनेक नेत्यांच्या प्रतिक्रिया येत असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे महत्त्वाचे नेते अमेय खोपकर यांनी थेट प्रतिक्रिया दिली आहे. मी शिवसेनेत होतो तेव्हा उद्धवबरोबर काम करायला मला काहीच हरकत नव्हती. पण समोरच्याच्या मनात आहे का, मी त्यांच्याबरोबर काम करावं? महाराष्ट्राची इच्छा असेल तर महाराष्ट्राने जाऊन सांगावं. अशा लहान-मोठ्या गोष्टींत मी माझा इगो आणत नाही”, असं म्हणत राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंसमोर युतीचा प्रस्ताव ठेवला होता. त्यांच्या या प्रस्तावावर, “किरकोळ भांडणं बाजूला ठेवायला मीही तयार आहे. सर्व मराठी माणसांच्या हितासाठी, महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येण्याचं आवाहन करतोय”, असं उद्धव ठाकरे म्हणाले होते.

## एकनाथ शिंदे पत्रकारांवर चिडले

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याबाबत पत्रकारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारले असता, ते पत्रकारांवरच चिडले. ‘अरे काही तरी कामाच्या गोष्टी करा रे, ते जाऊ द्या’ असा त्रागा व्यक्त करत त्यांनी यावर अधिक बोलणे टाळले. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही ‘हा विषय त्या दोघांचा आहे. ते दोघे भाऊ आहेत. त्यांना काय वाटते त्याप्रमाणे ते निर्णय घेऊ शकतात. त्या विषयी आम्ही मत व्यक्त करू शकत नाही,’ असे सांगत यावर अधिक बोलणे टाळले. साताऱ्यात आज दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार आहेत. एकनाथ शिंदे आपल्या दरे गावी मुक्कामी आले आहेत, तर अजित पवार पक्षाच्या कार्यक्रमानिमित्त साताऱ्यात आहेत. दरम्यान, आज शिवसेना ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे आणि मनसेचे राज ठाकरे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सर्वत्र सुरू झाल्या. या विषयी दरे (ता. महाबळेश्वर) येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विचारले असता, पत्रकारांवरच चिडले. ‘अरे काही तरी कामाच्या गोष्टी करा. ते जाऊ द्या! ’ असे म्हणत रागावले.

# 'एआय'चा उपयोग स्टार्टअपसाठी करा : मुथा

## शिक्षण विश्व: पीसीसीओईआरमध्ये 'देव कार्निवल'चे उत्साहात उद्घाटन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यापुढील काळात मोठ्या प्रमाणावर होणार आहे. 'एआय ' मुळे रोजगाराच्या संधी जातील अशी भीती व्यक्त केली जाते; परंतु हे खरे नाही. यामुळे रोजगारांच्या संधी, संकल्पना यामध्ये बदल होणार आहे. नव अभियंत्यांनी नोकरीच्या मागे धावण्याऐवजी 'एआय'चा उपयोग स्टार्टअप साठी करावा असे गुगल डेव्हलपर ग्रुपच्या पुणे विभागाचे प्रमुख महावीर मुथा यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे नेक्स्ट जनरेशन डेव्हलपमेंट क्लब च्या सहकार्याने 'देव कार्निवल'चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी कुशल विजय, साज्ञिक घोष, रॉबिन बंटा, तरुण अभिचंदानी, अमोल निटवे, देवेंद्र यादव, पीसीसीओईआर प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, सेंट्रल प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे, संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अर्चना चौगुले, प्रा. डॉ. महेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते. 'देव कार्निवल'मुळे तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांना ऐकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली आहे. भविष्यात विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आयटी, ऑटोमेशन, औद्योगिक क्षेत्रात कसे बदल होत आहेत आणि होणार आहेत याची माहिती मिळेल. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला पाहिजे, यामुळे तुमच्या ज्ञानाच्या कक्षा अधिक रुंदावत जातील असे डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी सांगितले.

इव्हॉल्व्हिंगएक्सचे संस्थापक आणि सीईओ अमोल निटवे, एक्सप्लोरव्हीआरचे सह-संस्थापक आणि मियावाकी एक्सप्रेस यांनी उद्योजकतेबद्दलची माहिती सांगितली. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

स्वागत डॉ. अर्चना चौगुले, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी, सूत्रसंचालन अर्णव वाणी, काव्या अगरवाल यांनी केले. तर आभार डॉ. सोनाली लुणावत यांनी मानले. पुष्कर सारडा, यश यादवाडकर, मल्हार गुजर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी विविध विद्याशाखेचे प्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते. सुमारे चारशे विद्यार्थी कार्निवल मध्ये सहभागी झाले होते. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्निवलचे आयोजन करण्यात आले होते.

### विद्यार्थ्यांना जागतिक संधीची माहिती

यावेळी झालेल्या चर्चासत्र मायक्रोसॉफ्टचे कुशल विजय यांनी जनरेटिव्ह एआय आणि त्याचा वापर करून करिअर कसे घडवायचे याविषयी मार्गदर्शन केले. वॉर्कहॅटचे सह-संस्थापक आणि सीईओ साज्ञिक घोष यांनी नो-कोड डेव्हलपमेंट याची माहिती दिली. एसएएसआर ॲंड डीचे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मॅनेजर देवेंद्र यादव यांनी गिटऑप्स आणि त्याचे व्यावहारिक अनुप्रयोग याची माहिती दिली. टीसीएसचे सायबर सिक्युरिटी युनिट - डिलिव्हरी पार्टनर रॉबिन बंटा यांनी सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. गुगलचे वरिष्ठ सॉफ्टवेअर इंजिनिअर तरुण अभिचंदानी यांनी औद्योगिक जगातील संधीची माहिती दिली.

# मुख्यमंत्री 'दीनानाथ'ला वाचवत आहेत

## गर्भवतीच्या मृत्यूप्रकरणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गर्भवतीच्या मृत्यूप्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय आणि डॉक्टरांना वाचविण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून होत असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी केला. याप्रकरणी रुग्णालय आणि डॉ. धनंजय केळकर यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबरोबरच रुग्णालयाचे विश्वस्त मंडळही बरखास्त झाले पाहिजे, अशी मागणी सपकाळ यांनी पत्रकारांशी बोलताना केली.**



सरकारला हे प्रकरण दडपायचे आहे,' असा आरोप करून सपकाळ म्हणाले, 'कारण नसताना ते चुकीची बाजू घेत आहेत. खऱ्याला खरे म्हणणे आणि चांगल्याला चांगले म्हणणे हा चांगुलपणा आहे. मात्र, या सरकारने हा चांगुलपणा नष्ट केला आहे. मातृत्वासाठी आलेल्या एका भगिनीचा मृत्यू होतो आणि या प्रकरणातील आरोपींना वाचवले जात आहे. मंगेशकर रुग्णालय हे लोकांच्या सेवेसाठी आहे. मात्र, ते रुग्णसेवेचा धंदा करत आहेत. त्या ठिकाणी सावकारी सुरू आहे. दरोडा घालून पैसे द्या, तरच उपचार करू, असे रुग्णांच्या नातेवाइकांना सांगितले जात आहे. या प्रकरणात पुरावा आपल्यासमोर आला आहे. आता अहवाल आला आहे. जोपर्यंत निर्दोषत्वाची 'क्लीन चिट' देणार नाही तोपर्यंत आम्ही तपासण्या आणि समित्या स्थापित करत राहू, असाच देवेंद्रजींच्या भूमिकेचा अर्थ आहे.'जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली रुग्णालयाचे नवीन विश्वस्त मंडळ स्थापन करावे, याकडे लक्ष वेधतानाच, 'या प्रकरणात मंगेशकर परिवाराने गप्प राहण्याची घेतलेली भूमिका ही तितकीच कर्कश आहे,' अशी टीका सपकाळ यांनी केली.'बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांकडे लक्ष द्यावे ही आपली संस्कृती आहे. त्याचे पालन करत एकता आणि अखंडतेची मशाल अबाधित तेवत ठेवणे हाच युगधर्म आहे,' असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी व्यक्त केले. 'अल्पसंख्य समाजाने घाबरू नये' हाच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काढलेल्या भारत जोडो यात्रेचा संदेश होता, याकडे त्यांनी लक्ष वेधले. गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित 'युवा अल्पसंख्याक संसदे'मध्ये सपकाळ बोलत होते. बिशप डॉ. थॉमस डाबरे, माजी आमदार मोहन जोशी, काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, अभय छाजेड, विवेक चव्हाण, संसदेचे संयोजक लुकास केदारी, सत्यवान गायकवाड, हाजी झुबेर मेमन, हाजी फरीद खान, फिरोज मसुलदार, सुलतान शाह या वेळी उपस्थित होते.सपकाळ म्हणाले, 'विविधतेमध्ये एकता हे भारताचे वैशिष्ट्य आहे. पण, काहींना ही एकता नको आहे. आम्ही सर्वांना जोडत आहोत. पण, समाजांना तोडणाऱ्या शक्ती प्रबळपणे काम करत आहेत. आमच्या हातामध्ये सुई-दोरा आहे. पण, दुसऱ्याच्या हातामध्ये कात्री असेल, तर काय करणार? बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांकडे लक्ष द्यावे, त्यांचे संरक्षण करावे, ही आपली संस्कृती आहे. एकता आणि अखंडतेची मशाल अबाधित तेवत ठेवणे हाच युगधर्म आहे.'डॉ. थॉमस डाबरे म्हणाले, 'जीवन स्वार्थासाठी नाही तर दुसऱ्यांच्या भल्यासाठी आहे हे आपल्याला येशूने शिकविले आहे. तरुणांना कमी लेखू नका. त्यांना प्रोत्साहन द्या.

### आरोपींना वाचवले जात आहे

सरकारला हे प्रकरण दडपायचे आहे,' असा आरोप करून सपकाळ म्हणाले, 'कारण नसताना ते चुकीची बाजू घेत आहेत. खऱ्याला खरे म्हणणे आणि चांगल्याला चांगले म्हणणे हा चांगुलपणा आहे. मात्र, या सरकारने हा चांगुलपणा नष्ट केला आहे. मातृत्वासाठी आलेल्या एका भगिनीचा मृत्यू होतो आणि या प्रकरणातील आरोपींना वाचवले जात आहे.

## जिल्ह्यातील अवैध प्लॉटिंग करणाऱ्यांचे धाबे दणाणले

# आता अवैध प्लॉटींग रडारवर!

### महामार्गावरील अतिक्रमण कारवाईनंतर अवैध प्लॉटींगचे पीएमआरडीएकडून सर्व्हेक्षण

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) अनधिकृत प्लॉटिंगवर कारवाईला सुरूवात केली आहे. पहिल्या टप्प्यात खेड तालुक्यात ही कारवाई करण्यात आली. आता मावळ, मुळशी, हवेली आदी तालुक्यातही ही कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यानंतर योग्य पडताळणी करून कारवाई केली जाणार आहे.**



पीएमआरडीए प्रशासनाकडून अनधिकृत प्लॉटिंगवर कारवाई केली होती. (ता. खेड) या ठिकाणी चार वेगवेगळी अनधिकृत प्लॉटिंग काढण्यात आली. यात ५४ हजार चौरस फूट परिसरामध्ये ही कारवाई करण्यात आली. गावागावातील होर्डिंगचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

त्याचबरोबर अशा प्रकारच्या अनधिकृत प्लॉटिंगची माहिती देखील गोळा करण्यात येणार आहे. त्या माध्यमातून अशा प्लॉटिंग विक्रीवर चाप बसणार आहे. याबाबत प्राधिकरणातील बांधकाम परवानगी विभागातील एनए परवानगी मिळाल्या असल्यास त्याची खात्री करून जागेची खरेदी विक्री करावी, असे आवाहन पीएमआरडीएच्या वतीने करण्यात आले आहे. पीएमआरडीए हद्दीतील खेड, आळंदी, चाकण, वडगाव घेनंद या पट्ट्यामध्ये त्याचप्रमाणे मावळ आणि मुळशी या तालुक्यात देखील मोठ्या प्रमाणामध्ये प्लॉटिंग होत आहे. नागरिकांकडून मोठ्या प्रमाणामध्ये पैसे उकळून अनधिकृत प्लॉट त्यांच्या माथी मारले जातात. यानंतर अशा जागेवर उभारण्यात आलेले बांधकाम अनधिकृत ठरून भविष्यामध्ये त्या विरोधात कारवाई होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यापूर्वीच अशा अनधिकृत प्लॉटिंगवर कारवाई त्याची मोहीम उभारण्यात आली आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली.

> "खेड तालुक्यातील अनधिकृत प्लॉटवर कारवाई केली आहे. नागरिकांच्या तक्रारीवरून पुढील अनधिकृत प्लॉट असल्याचे पाहून कारवाई केली जाणार आहे.
>
> -दीप्ती सूर्यवंशी
> (सहआयुक्त - अनधिकृत बांधकाम व निर्मुलन विभाग)

## देशमुख हत्येतील सहआरोपींना वाचविले

### जरांगे-पाटील यांचा मुख्यमंत्र्यावर आरोप

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**परळीतील ज्यांच्या कार्यालयात खंडणी आणि संतोष देशमुख यांच्या खुनाचे नियोजन झाले. त्या माजी मंत्र्यांना (धनंजय मुंडे) यांना सहआरोपी केले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मंत्र्याला (धनंजय मुंडे) यांना वाचविले असल्याचा आरोप मराठा नेते मनोज जरांगे-पाटील यांनी शनिवारी केला आहे.**

जरांगे यांनी नेरे येथे पत्रकारांशी संवाद साधला. जरांगे म्हणाले, 'संतांची भूमी असलेला बीड जिल्हा बदनाम झाला आहे. राजकीय स्वार्थासाठी गुंड टोळ्यांच्या माध्यमातून खून केले जात आहेत. सत्तेतून पैसा, संपत्ती कमावणे. त्यामुळे बीड जिल्ह्यात नागरिकांना त्रास झाला आहे. हे थांबविण्यासाठी समाजाने खोट्याला खोटे म्हटले पाहिजे. शासनाने खोट्याची पाठराखण करू नये, अशी अपेक्षा होती. संतोष देशमुख हत्येतील सहआरोपी यांना राजकीय पाठबळामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी वाचवले आहे. त्यामुळे सह आरोपी करण्याची मागणी करण्याचे बंद करावे लागले आहे'. वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्याची सुपारी धनंजय मुंडे यांनी दिली होती असा दावा बीडचे निलंबित पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले यांनी केला आहे. त्याबाबत विचारले असता जरांगे म्हणाले, 'तपासात सत्य पुढे येईल. त्याबाबतची सविस्तर माहिती नाही. २० वर्षे वाल्मिक कराडचा वापर केला.

> कुणबी नोंद सापडलेल्या लोकांना अधिकारी जाणीवपूर्वक प्रमाणपत्र देत नाहीत. अशा अधिकाऱ्यांचे निलंबन करण्याची मागणी केली जाणार आहे. अधिका-यांच्या पाठीमागे कोणतीही राजकीय शक्ती असली तरी त्यांना घरी बसविल्याशिवाय शांत बसणार नाही.
>
> -मनोज जरांगे

अनेकांच्या हत्या केल्या, पैसे कमविले, आता मारून टाकावे असे धनंजय मुंडे यांना वाटले असेल. जे काही आहे, ते तपासात निष्पन्न होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांचे सगेसोयरे असल्याने गर्भवतीच्या मृत्यूप्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई होत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अवमान करणा-यांनाही सोडले जाते. शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन फसवले. सत्ता हातात आली म्हणून अत्याचार केल्यास जनता सोडणार नाही'.



## शहरात दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या पिंपरी चिंचवड शहरात अतिशय दूषित व दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे लहान मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

याबाबत तातडीने महापालिका आरोग्य, पाणीपुरवठा विभागाने लक्ष द्यावे. दुर्गंधीयुक्त आणि दूषित पाण्यामुळे परिसरात जलजन्य आजारांचे प्रमाण वाढू नये याची काळजी घ्यावी अशी नागरिकांची मागणी आहे.


चिखली मोशी पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने अशुद्ध, दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असलेल्या तक्रारींबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचे लक्ष वेधले आहे.

याबाबत फेडरेशनच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, महानगरपालिकेच्या सर्व भागात पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येणारा पाणीपुरवठा अतिशय अशुद्ध आणि घाण स्वरूपाचा आहे.

या पाण्याला उग्र स्वरूपाचा वास येत आहे. हे पाणी पिण्यासाठी योग्य वाटत नाही. या घाण आणि अशुद्ध पाण्यामुळे पिंपरी चिंचवड शहरांमध्ये रोगराई पसरण्याची शक्यता आहे.

मोठ्या प्रमाणात जलजन्य आजार पसरण्याची शक्यता आहे. पाणीपुरवठा विभागाला योग्य त्या सूचना देऊन शुद्ध पाणीपुरवठा नागरिकांना करावा . नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही याची काळजी घ्यावी. पुढील चार दिवसांमध्ये या दूषित होणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये सुधारणा झाली नाही तर फेडरेशन मार्फत लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा देखील देण्यात आला आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### संत विषयात देव पाहतात, आपण देवात विषय पाहतो.

प्रत्येकजण भक्ती करीतच असतो, कारण व्यापक दृष्टीने पाहिले तर भक्ती म्हणजे आवड. परमार्थात भक्ती म्हणजे परमात्म्याची आवड असा अर्थ आहे. सर्वांना विषयाची आवड असते, तेव्हा सर्व लोक एकपरीने विषयाची भक्तीच करीत असतात. विषयाची आवड ही देहबुद्धीला धरून, देहबुद्धी वाढविणारी, आणि स्वार्थी असते. ही कमी झाल्याशिवाय परमात्म्याची आवड म्हणजे भक्ती उपजणे शक्य नाही. याकरिता भक्तिमार्गातली पहिली पायरी म्हटली म्हणजे मोबदल्यारहित, निष्काम, नि:स्वार्थी परमात्मस्मरण करणे; आणि शेवटची पायरी म्हणजे आपण स्वत:ला विसरणे, देहबुद्धि विलगीत होणे, ही होय. देहरक्षण परमात्मप्राप्तीकरिता करावे. केवळ विषयसेवनाकरिताच जगणे असेल तर त्यापेक्षा मेलेले काय वाईट ?

जयंत्यादि उत्सव आपण करतो ते भगवंताच्या ठिकाणी प्रेम उत्पन्न व्हावे म्हणून. मुळात प्रेम नसेल तर, ज्याच्यावर प्रेम असते त्याला आपण जो उपचार करतो, तो उपचार करून प्रेम आणायचे असते. प्रेम आणि उपचार यांचा अन्योन्य संबंध असतो. या उपचाराने भगवंताशी संबंध वाढतो, आणि त्यामुळे भगवंतावरचे प्रेमही वाढते. आई आपल्या लहान मुलाला दागिने वगैरे घालते, त्याचे त्या लहान मुलाला काही सुख नसते, उलट थोडे दु:खच वाटते, पण त्यामुळे त्या आईला बरे वाटते म्हणून ती तसे करते. भगवंताला आपण दागिने वगैरे घातले तर ते स्वत:करिताच होय. वास्तविक भगवंताला काय कमी आहे ? संत विषयात देव पाहतात, पण आम्ही मात्र देवातसुद्धा विषय पाहतो. रामाची मूर्ती काय उत्तम घडविली आहे, देऊळ किती सुंदर बांधले आहे, वगैरे आम्ही म्हणतो. आमची वृत्ती विषयाकार बनली, म्हणून आम्हाला जिकडेतिकडे विषयच दिसतो. संतांची वृत्ती राममयच असते, त्यांना सर्वत्र रामच दिसतो. तेरा कोटी जप केला म्हणजे रामदर्शन होते असे म्हणतात. त्याचा अर्थ, तेरा कोटी जप व्हायला रोज दहाबारा तास या प्रमाणात जवळजवळ बारा वर्षे लागतात, इतका सतत ध्यास लागला म्हणजे ते रूपच तो होतो. नाम कधीच वाया जात नाही. केव्हा केव्हा एखाद्याला दर्शन होत नाही, तेव्हा त्याचे नाम दुसरीकडे खर्च झाले असे समजावे; मग ते विषयप्राप्तीकरिता असेल, किंवा त्याचे पूर्वपाप घटत असेल. विषयाकरिता नाम खर्च करू नये, नामाकरिता नाम घ्यावे.

**बोधवचन:- नाम आपले सर्वस्व वाटले पाहिजे.**



## 'स्टेट'मेंट

**अधिकराव दिवे-पाटील**
संस्थापक, संपादक

**बघता बघता राज्यामधील महानगरपालिकांच्या निवडणुका तोंडावर आल्या आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, कोल्हापूर, संभाजीनगर, नागपूर सगळ्या निवडणुकांकडेच सर्व राजकीय पक्षांचे लक्ष आहे. त्यातल्या त्यात विचार केला, तर सर्वांसाठी मुंबई महानगरपालिका म्हणजे जगणे आणि मरणे, यांची जणू स्पर्धा सुरू आहे.**

# मुंबई महापालिकेचा गजर 'उबाठा' ची एकटक नजर !



### तर उबाठा गट संपेल !

मुंबई महानगरपालिकेची निवडणूक ही उद्धव ठाकरे यांच्या गटासाठी आता जीवन मरणाची लढाई झाली आहे. पक्ष फुटला, नाव गेले, चिन्ह गेले हातातली सगळीकडची सत्ता जवळजवळ गेल्यात जमा असताना फक्त मुंबई महानगरपालिकेची निवडणूक हीच काय ती त्यांच्यासाठी संजीवनी ठरणार आहे ! त्यासाठी ते आतापासूनच पाण्यात देव घालून बसलेत!

### ही तर शिवसेनेसाठी दुभती म्हैस..

'उबाठा' साठी मुंबई महानगरपालिका निवडणूक म्हणजे अस्तित्वाची लढाई आहे. कपाळावरचं कुंकू नसले तरी चालेल. ते पुसले गेले तर मग कठीणच.. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई महानगरपालिका मूळ शिवसेनेच्या अधिपत्याखाली होती. आर्थिकदृष्ट्या अतिशय संपन्न पालिकेने शिवसेनेला राजकीयदृष्ट्या मजबूत करण्याचे काम सातत्याने केले. तिला शिवसेनेची 'दुभती म्हैस' म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

### प्रचंड आर्थिक उलाढाल असणारी पालिका !

मुंबई महापालिकेवर वर्चस्वाची लढाई म्हणजे निवडणूक आहे. काँग्रेस, भाजपासह सर्वच पक्षांना ती हवी आहे. भारतामधील एकेका राज्यापेक्षा मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मोठा असतो. गेल्या वेळी निवडणुकीत भाजपा व शिवसेनेने आपापली वेगळी चूल मांडली होती. यात शिवसेनेला जबर नुकसान सहन करावे लागले होते. भाजपाने शिवसेनेला बरोबरीची टक्कर दिली होती. एकसंघ शिवसेना भाजपा च्या धक्क्याने गोंधळली होती, पण नंतर भाजपाने एक पाऊल मागे घेत, संगत कायम ठेवली.

### मुंबईतली राजकीय समीकरणे अनाकलनीय !

आज मात्र, स्थिती अगदी भिन्न आहे. २०१९ च्या निवडणुकीनंतर शिवसेना भाजपापासून दुरावली. त्यामुळे राजकारणाची दिशाच बदलली. शिवसेनेने कट्टर विरोधक असलेल्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीसोबत उद्धव ठाकरे यांनी सत्ता स्थापन केली. 'युती' सोडून शिवसेना आघाडीत सामील झाली. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले.

### शिवसेनेचा मोठा लचका तोडला गेला..

सत्तेत असताना त्यांना थोडीफार कुणकुण होती, पण आपल्या दिव्याखालचा अंधार अधिक गडद होत असल्याचे त्यांना समजलेच नाही. सत्तेच्या प्रकाशात ते रमलेले बघून त्यांच्या प्रमुख सहकाऱ्यांनी शिवसेनेचा मोठा लचका तोडला. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंपासून पक्ष चिन्ह कायदेशीर मार्गाने हिसकावले. मुंबई महानगरपालिकेतील नगरसेवक सुद्धा उद्धव यांना सोडून गेले. कोकणात भास्कर जाधव सोडले, तर एकही निर्वाचित आमदार शिवसेनेकडे नाही. मुंबईत खिळखिळी झालेल्या शिवसेनेच्या बळावर ते सध्या निवडणूक जिंकू पाहत आहेत. त्यांनी आपले नाजूक आरोग्य बघून पक्षाची धुरा आदित्य ठाकरे यांच्या खांद्यावर टाकण्याचे हळूवारपणे सुरु केले आहे. आदित्य यांच्यासोबत निष्ठा असणाऱ्यांना पक्षांतर्गत पदे देण्याचे काम सुरु आहे, हे सगळ्यांच्याच लक्षात आले आहे.

### आदित्य यांच्या नेतृत्वाची कसोटी

लोकसभा निवडणुकीत विजयाचे श्रेय फक्त शिवसेनेच्या मतदारांचे नाही तर महाआघाडीच्या दलित व अल्पसंख्य मतदारांनी शिवसेनेला भरभरून मते दिलीत. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत याच मतदारांनी शिवसेनेकडे पाठ फिरविली. यातून काय घडले, आपण सर्वांनीच अनुभवले आहे. उद्धव यांना दलित व अल्पसंख्यांक मतदारांचा विश्वास नव्याने संपादन करावा लागेल. भाजपा व शिंदे गट यांचा त्यांना सामना करावा लागेल. मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वतंत्र लढण्याची घोषणा आदित्य ठाकरे यांनी केली आहे. उबाठा मधील गळती अजून सुरूच आहे. आदित्य ठाकरे यांच्या समोर मुंबई महापालिका निवडणूक म्हणजे 'करो वा मरो' सदृश्य म्हटली तरी चालेल. त्यांच्या नेतृत्वाची कसोटी या निवडणुकीतून लागेल यात शंकाच नाही !

### आता सहाच महिने थांबा..

मुंबई महानगरपालिकेची निवडणूक अवघ्या सहा महिन्यांवर येऊन ठेपली आहे. सर्व राजकीय पक्ष आपापल्या परीने राजकीय फासे टाकत आहेत. महायुती मधील एकनाथ शिंदे यांच्या गटांनी राज ठाकरे यांच्याबरोबर जुळवून घेण्याचे ठरवलेले आहे. शिवाय त्यांच्याकडे भाजपा आणि अजितदादांचा पक्षही आहेच. या उलट उबाठा कडे दोन्ही काँग्रेसही आहेत का नाहीत, याचा सुगावा देखील लागत नाही. 'एकला चलो रे' ची भूमिका उबाठा यांनी घेतली, तर मुंबईत बलाढ्य राजकीय पक्षांशी लढता लढता त्यांचा पाचोळा होणार आहे आणि त्यांचा उरला सुरला गटही नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, हे मात्र नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तर मराठी माणसावर उपकार होतील!

## ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या चर्चेवर राऊत यांचे मोठे वक्तव्य

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राज ठाकरे यांनी २००५ मध्ये स्वतःचा पक्ष स्थापन केल्यानंतर वेगळे झालेले ठाकरे कुटुंब पुन्हा एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण, दोन्ही ठाकरे बंधुंनी महाराष्ट्रासाठी तडजोड करण्याचे आणि एकत्र येण्याचे संकेत दिले आहेत. अभिनेते आणि दिग्दर्शक महेश मांजरेकर यांच्या मुलाखतीत बोलताना राज ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी उद्धव ठाकरे यांच्याबरोबर एकत्र येण्याचे वक्तव्य केले आहे. त्यानंतर एका वेगळ्या कार्यक्रमात बोलताना उद्धव ठाकरे यांनीही राज ठाकरे यांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.**





दरम्यान आज शिवसेनेचे (उद्धव ठाकरे) खासदार संजय राऊत यांना राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे युतीच्या विषयावर ऐकमेकांशी बोलणार का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. याला उत्तर देताना संजय राऊत म्हणाले, “का नाही बोलणार? एक लक्षात घ्या मी तुम्हाला वारंवार सांगतोय. माझी आत्ताच उद्धव साहेबांशी चर्चा झाली. मी त्यांच्याशी सविस्तर बोललो आहे. ही मुंबई, महाराष्ट्र आणि मराठी माणसावर कोणी घाव घातल असेल, तर एकत्र यावेच लागेल. पण, आम्ही वाट पाहू. यापेक्षा आणखी चांगले घडण्याची वाट पाहू.”“राज ठाकरे याक्षणी आम्हाला भाजपा आणि एसएनशी (शिंदे गट) यांच्याबरोबर दिसत आहेत. आमच्या दृष्टीने ते महाराष्ट्राच्या हिताचे काम करत नाहीत. ते राज ठाकरे यांचा वापर करून राज्यातील मराठी माणसाला पडद्यामागून त्रास द्यायचे कारस्थान रचत आहेत. हे राज ठाकरे यांच्या लक्षात आले असेल, तर हे मराठी माणसावर उपकार होतील”, असेही संजय राऊत यांनी म्हटले.संजय राऊत पुढे म्हणाले की, “राज ठाकरे यांच्याकडून एक चांगली भूमिका पुढे येत असेल, तर त्या भूमिकेला नाकारण्याचा करंटेपणा आमच्याकडून होणार नाही. कारण बाळासाहेबांनी स्थापन केलेल्या शिवसेनेतील प्रवास आम्ही विसरू शकत नाही. उद्धव ठाकरे विसरू शकत नाही. आमच्यात मतभेद झाले हे खरे आहे. कारण, तुम्ही महाराष्ट्राच्या आणि बाळासाहेब ठाकरेंच्या शत्रूंना घरात घेतले. हा आमच्यासाठी मतभेदाचा विषय राहिला.”यावेळी, संजय राऊत यांनी राज ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढलेल्या भेटीगाठीवरही भाष्य केले. ते म्हणाले, “भेटी होतात म्हणून काय झाले. ते (एकनाथ शिंदे) अमित शाह यांनाही भेटतात. ते राज ठाकरेंना सांगायला गेले असतील, फडणवीस माझे ऐकत नाहीत. अमित शाह माझे ऐकत नाहीत. उद्या आमच्या दारत पण येतील, बघा आमचे ऐकत नाहीत म्हणून. संजय राऊत यांना राज ठाकरे आणि

### राज ठाकरे यांची भूमिका चांगली

तुम्ही महाराष्ट्राच्या आणि बाळासाहेब ठाकरेंच्या शत्रूंना घरात घेतले. हा आमच्यासाठी मतभेदाचा विषय राहिला.”यावेळी, संजय राऊत यांनी राज ठाकरे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढलेल्या भेटीगाठीवरही भाष्य केले. ते म्हणाले, “भेटी होतात म्हणून काय झाले. ते (एकनाथ शिंदे) अमित शाह यांनाही भेटतात. ते राज ठाकरेंना सांगायला गेले असतील, फडणवीस माझे ऐकत नाहीत. अमित शाह माझे ऐकत नाहीत. उद्या आमच्या दारत पण येतील, बघा आमचे ऐकत नाहीत म्हणून.ज ठाकरे यांनी २००५ मध्ये स्वतःचा पक्ष स्थापन केल्यानंतर वेगळे झालेले ठाकरे कुटुंब पुन्हा एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

उद्धव ठाकरे युतीच्या विषयावर ऐकमेकांशी बोलणार का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. याला उत्तर देताना संजय राऊत म्हणाले, “का नाही बोलणार? एक लक्षात घ्या मी तुम्हाला वारंवार सांगतोय. माझी आत्ताच उद्धव साहेबांशी चर्चा झाली. मी त्यांच्याशी सविस्तर बोललो आहे. ही मुंबई, महाराष्ट्र आणि मराठी माणसावर कोणी घाव घातल असेल, तर एकत्र यावेच लागेल. पण, आम्ही वाट पाहू. यापेक्षा आणखी चांगले घडण्याची वाट पाहू.”“राज ठाकरे याक्षणी आम्हाला भाजपा आणि एसएनशी (शिंदे गट) यांच्याबरोबर दिसत आहेत. आमच्या दृष्टीने ते महाराष्ट्राच्या हिताचे काम करत नाहीत. ते राज ठाकरे यांचा वापर करून राज्यातील मराठी माणसाला पडद्यामागून त्रास द्यायचे कारस्थान रचत आहेत. हे राज ठाकरे यांच्या लक्षात आले असेल, तर हे मराठी माणसावर उपकार होतील”, असेही संजय राऊत यांनी म्हटले.संजय राऊत पुढे म्हणाले की, “राज ठाकरे यांच्याकडून एक चांगली भूमिका पुढे येत असेल, तर त्या भूमिकेला नाकारण्याचा करंटेपणा आमच्याकडून होणार नाही. कारण बाळासाहेबांनी स्थापन केलेल्या शिवसेनेतील प्रवास आम्ही विसरू शकत नाही. उद्धव ठाकरे विसरू शकत नाही.

# तो अहवाल जाळून टाकला पाहिजे

## भिसे मृत्यू प्रकरणावरील ‘ससून’च्या अहवालावरून सुळे संतापल्या

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे काही दिवसांपूर्वी गर्भवती महिला तनिषा भिसे यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर संपूर्ण राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. यानंतर या प्रकरणाची चौकशी वेगवेगळ्या समित्यांच्या माध्यमातून चौकशी करण्यात येत आहे.**






आता या प्रकरणावर ससून रुग्णालयाच्या समितीचा अहवाल समोर आला आहे. मात्र, हा अहवाल समोर आल्यानंतर त्या अहवालात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला क्लीन चिट देण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप विरोधक करत आहेत. दरम्यान, ससून रुग्णालयाच्या समितीचा अहवाल समोर आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या चांगल्याच संतापल्याचं पाहायला मिळालं आहे. ससून रुग्णालयाच्या समितीच्या अहवालावर बोलताना तो अहवाल जाळून टाकला पाहिजे, असं सुप्रिया सुळेन यांनी माध्यमांशी बोलताना म्हटलं आहे. गर्भवती महिला तनिषा भिसे मृत्यू प्रकरणासंदर्भात ससून रुग्णालयाचा अहवाल समोर आला असून त्या अहवालात रुग्णालयाला क्लीन चिट देण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात येत आहे, असा प्रश्न माध्यमांच्या प्रतिनिधींनी सुप्रिया सुळे यांना विचारला.

यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, “मला विश्वासच बसत नाही की असा काही अहवाल येऊ शकतो? खरं तर मी प्रशांत जगताप (राष्ट्रवादी

### सुप्रिया सुळे चांगल्याच संतापल्या

त्या अहवालात दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाला क्लीन चिट देण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप विरोधक करत आहेत.दरम्यान, ससून रुग्णालयाच्या समितीचा अहवाल समोर आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या चांगल्याच संतापल्याचं पाहायला मिळालं आहे.

शरद पवार गटाचे नेते) यांनी तनिषा भिसे मृत्यू प्रकरणाबाबत न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला. मी त्यांचं कौतुक करते. तसेच मी त्या अहवालाचा निषेध करते”, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

मला असं वाटतं की तो अहवाल जाळून टाकला पाहिजे, कोणाच्या तरी घरातील एक लेक गेली, मुलांची आई गेली आहे. मग एवढा चुकीचा अहवाल कसा येऊ शकतो? हे धक्कादायक आहे, असंवेदनशील आहे. आम्ही तो अहवाल स्वीकारणार नाही. मला असं वाटतं तो अहवाल (ससून रुग्णालयाच्या समितीचा अहवाल) कचऱ्याच्या डब्यात नाही, तर तो अहवाल जाळून टाकला पाहिजे. जोपर्यंत त्या माऊलीला न्याय मिळणार नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही”, असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.आता या प्रकरणावर ससून रुग्णालयाच्या समितीचा अहवाल समोर आला आहे.

# द्विपक्षीय सहकार्यास प्रचंड वाव!

## इलॉन मस्क यांच्याबरोबर चर्चेनंतर पंतप्रधान मोदींकडून विश्वास व्यक्त



।ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**तंत्रज्ञान आणि नवउपक्रमांच्या क्षेत्रात भारत आणि अमेरिकेदरम्यान सहकार्य करण्यास प्रचंड वाव आहे असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्यक्त केला. यासंबंधी आपली अमेरिकी अब्जाधीश इलॉन मस्क यांच्याबरोबर चर्चा झाली असल्याचे त्यांनी 'एक्स'वर लिहिले.**

अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स यांच्या नियोजित भारत दौऱ्याच्या काही दिवस आधी पंतप्रधान मोदी आणि मस्क यांच्यात हे संभाषण झाले आहे. त्याशिवाय दोन्ही देशांबरोबर द्विपक्षीय व्यापार करार करण्यासाठी वाटाघाटीदेखील सुरू आहेत. त्यामुळे मोदी-मस्क चर्चा महत्त्वाची मानली जात आहे. मोदी यांनी 'एक्स'वर लिहिले की, "मी इलॉन मस्क यांच्याशी बोललो आणि विविध मुद्द्यांवर चर्चा केली. या वर्षाच्या सुरुवातीला वॉशिंग्टनमध्ये झालेल्या आमच्या भेटीदरम्यान ज्या मुद्द्यांवर चर्चा झाली होती त्याविषयीदेखील आम्ही बोललो. तंत्रज्ञान आणि नवउपक्रम या क्षेत्रामध्ये सहकार्य करण्यास भरपूर वाव आहे. या क्षेत्रांमध्ये अमेरिकेबरोबर भागीदारी वाढवण्यास भारत कटिबद्ध आहे. पंतप्रधान मोदी फेब्रुवारीमध्ये अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीसाठी अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले असता त्यांची मस्क यांच्याबरोबरही भेट झाली होती. त्या भेटीनंतर, आम्ही अवकाश, गतिशीलता, तंत्रज्ञान आणि नवउपक्रम याविषयी बोललो असे मोदी यांनी सांगितले होते. तसेच आपण किमान सरकार, कमाल शासन हा अनुभवनही मस्क यांना सांगितल्याचे ते म्हणाले होते. त्या भेटीसाठी मस्क आपले कुटुंब आणि मुलांना बरोबर घेऊन आले होते.इलॉन मस्क हे भारतामध्ये गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. ते गेल्या वर्षी, लोकसभा निवडणुकांपूर्वीच भारतात येणार होते. मात्र, त्यावेळी त्यांचा तो दौरा पुढे ढकलला गेला होता. भारतातील कार उत्पादनासाठी ते दोन अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची अपेक्षा होती. भारतामध्ये विजेवर चालणाऱ्या कारची विक्री हळूहळू पण निश्चित गतीने वाढत आहे. अलिकडेच भारत सरकारने विजेवर चालणाऱ्या कारच्या आयातशुल्कामध्ये १५ टक्के कपात केली आहे, त्याचा सर्वाधिक फायदा मस्क यांना होणे अपेक्षित आहे. अमेरिकेचे उपाध्यक्ष जे डी व्हान्स यांच्या नियोजित भारत दौऱ्याच्या काही दिवस आधी पंतप्रधान मोदी आणि मस्क यांच्यात हे संभाषण झाले आहे.

त्याशिवाय दोन्ही देशांबरोबर द्विपक्षीय व्यापार करार करण्यासाठी वाटाघाटीदेखील सुरू आहेत. त्यामुळे मोदी-मस्क चर्चा महत्वाची मानली जात आहे. मोदी यांनी 'एक्स'वर लिहिले की, "मी इलॉन मस्क यांच्याशी बोललो आणि विविध मुद्द्यांवर चर्चा केली. या वर्षाच्या सुरुवातीला वॉशिंग्टनमध्ये झालेल्या आमच्या भेटीदरम्यान ज्या मुद्द्यांवर चर्चा झाली होती त्याविषयीदेखील आम्ही बोललो. तंत्रज्ञान आणि नवउपक्रम या क्षेत्रामध्ये सहकार्य करण्यास भरपूर वाव आहे. या क्षेत्रांमध्ये अमेरिकेबरोबर भागीदारी वाढवण्यास भारत कटिबद्ध आहे. पंतप्रधान मोदी फेब्रुवारीमध्ये अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीसाठी अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले असता त्यांची मस्क यांच्याबरोबरही भेट झाली होती. त्या भेटीनंतर, आम्ही अवकाश, गतिशीलता, तंत्रज्ञान आणि नवउपक्रम याविषयी बोललो असे मोदी यांनी सांगितले होते. तसेच आपण किमान सरकार, कमाल शासन हा अनुभवनही मस्क यांना सांगितल्याचे ते म्हणाले होते. त्या भेटीसाठी मस्क आपले कुटुंब आणि मुलांना बरोबर घेऊन आले होते.इलॉन मस्क हे भारतामध्ये गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत.

### मस्क यांना भारतीय बाजारपेठेत रस

ते गेल्या वर्षी, लोकसभा निवडणुकांपूर्वीच भारतात येणार होते. मात्र, त्यावेळी त्यांचा तो दौरा पुढे ढकलला गेला होता. भारतातील कार उत्पादनासाठी ते दोन अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याची अपेक्षा होती. भारतामध्ये विजेवर चालणाऱ्या कारची विक्री हळूहळू पण निश्चित गतीने वाढत आहे. अलिकडेच भारत सरकारने विजेवर चालणाऱ्या कारच्या आयातशुल्कामध्ये १५ टक्के कपात केली आहे, त्याचा सर्वाधिक फायदा मस्क यांना होणे अपेक्षित आहे.त्या भेटीनंतर, आम्ही अवकाश, गतिशीलता, तंत्रज्ञान आणि नवउपक्रम याविषयी बोललो असे मोदी यांनी सांगितले होते. तसेच आपण किमान सरकार, कमाल शासन हा अनुभवनही मस्क यांना सांगितल्याचे ते म्हणाले.

# दिल्लीमध्ये इमारत कोसळून ४ जणांचा मृत्यू

## ढिगाऱ्याखाली अनेकजण दबल्याची भीती; बचावकार्य सुरू



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दिल्लीच्या मुस्तफाबाद परिसरात शनिवारी रात्री एक इमारत कोसळून मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. एनडीआरएफ आणि दिल्ली पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी बचाव कार्य सुरू केले आहे. अतिरिक्त पोलीस उपायुक्त संदीप लांबा यांनी दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत १० लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढले आहे.**

अग्निशामक दलाचे अधिकारी राजेंद्र अठवाल यांनी सांगितले की, आम्हाला रात्री २.५० वाजता इमारत कोसळल्याची माहिती मिळाली. आमचे पथक घटनास्थळी पोहोचले तेव्हा संपूर्ण इमारत जमीनदोस्त झाल्याचे दिसले. ढिगाऱ्याखाली काही लोक अडकल्याची माहिती स्थानिकांनी दिल्यानंतर आम्ही तात्काळ बचावकार्य सुरू केले. एनडीआरएफ, दिल्ली पोलीस आणि इतर शासकीय यंत्रणा बचाव कार्यात सहकार्य करत आहेत.

स्थानिकांनी या घटनेची माहिती देताना सांगितले की, चार मजल्याच्या इमारतीमध्ये चार ते पाच कुटुंबे राहत होते. इमारताच्या मालकाच्या कुटुंबाव्यतिरिक्त इतर भाडेकरू होते. इमारत कोसळल्यानंतर अद्याप चार जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.शुक्रवार पासून दिल्लीतील हवामानात मोठा बदल पाहायला मिळत आहे. अनेक परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या. अवकाळी पाऊस आणि वाऱ्यामुळे पडझड होऊन एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे, तर दोन जण जखमी झाले आहेत. तसेच मधु विहार परिसरात एक निर्माणाधीन इमारत कोसळली. अग्निशामक दलाचे अधिकारी राजेंद्र अठवाल यांनी सांगितले की, आम्हाला रात्री २.५० वाजता इमारत कोसळल्याची माहिती मिळाली.

आमचे पथक घटनास्थळी पोहोचले तेव्हा संपूर्ण इमारत जमीनदोस्त झाल्याचे दिसले. ढिगाऱ्याखाली काही लोक अडकल्याची माहिती स्थानिकांनी दिल्यानंतर आम्ही तात्काळ बचावकार्य सुरू केले. एनडीआरएफ, दिल्ली पोलीस आणि इतर शासकीय यंत्रणा बचाव कार्यात सहकार्य करत आहेत.

स्थानिकांनी या घटनेची माहिती देताना सांगितले की, चार मजल्याच्या इमारतीमध्ये चार ते पाच कुटुंबे राहत होते. इमारताच्या मालकाच्या कुटुंबाव्यतिरिक्त इतर भाडेकरू होते.

### दिल्लीतील हवामानात वेगाने बदल

इमारत कोसळल्यानंतर अद्याप चार जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत.शुक्रवार पासून दिल्लीतील हवामानात मोठा बदल पाहायला मिळत आहे. अनेक परिसरात वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या. अवकाळी पाऊस आणि वाऱ्यामुळे पडझड होऊन एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

# उर्वशी रौतेलाच्या वक्तव्यामुळे नवा वादंग



बॉलीवूड अभिनेत्री उर्वशी रौतेला ही नेहमी चर्चेत असते. कधी सुंदर, स्टनिंग, ग्लॅमरस फोटोमुळे तर कधी डान्समुळे उर्वशी चर्चेत असते. नुकतंच तिनं असं काही विधान केलं आहे, ज्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. तिच्या वक्तव्यामुळे बद्रीनाथ धामचे पंडितांनी संताप व्यक्त केला आहे. नेमकं हे प्रकरण काय आहे? जाणून घ्या... काही दिवसांपूर्वी उर्वशी रौतेलाने सिद्धार्थ कन्ननच्या मुलाखतीमध्ये म्हटलं होतं की, बद्रीनाथ धामजवळ माझ्या नावाचं एक मंदिर आहे. जिथे लोक जातात आणि फुल वाहून पूजा करतात. तेव्हा सिद्धार्थने विचारलं, "हे तुझं मंदिर आहे." तेव्हा अभिनेत्री म्हणाली, "हो, माझं मंदिर आहे. तसंच माझी इच्छा आहे की, दक्षिण भारतातदेखील माझं एक मंदिर असावं." उर्वशीच्या याच वक्तव्यामुळे वादंग निर्माण झाला आहे. तिच्या वक्तव्यांवर पंडितांनी संताप व्यक्त केला आहे. "हा सर्व मूर्खपणा आहे, ते मंदिर तिचं नाही तर उर्वशी नावाच्या देवी सतीचे आहे", असं पंडितांनी स्पष्ट केलं आहे. ते म्हणाले की, "उर्वशी मंदिर हिंदू पौराणिक कथांमध्ये पूजनीय असलेल्या देवी सतीशी संबंधित आहे. हे १०८ शक्तीपीठांपैकी एक मानले जाते." 'इंडिया टुडे' या वृत्तसंस्थेशी संवाद साधताना ते म्हणाले, "हे तिचं मंदिर नाही. अशी विधाने अस्वीकार्य आहेत आणि सरकारने असे दावे करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे." ब्रह्म कपाल तीर्थ पुजारी सोसायटीचे अध्यक्ष अमित सती यांनीही उर्वशीच्या वक्तव्याचा निषेध केला आहे. ते म्हणाले की, अशा वक्तव्यांमुळे येथील लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जातात. त्यामुळे उर्वशी रौतेलाने माफी मागितली पाहिजे.उत्तराखंडमधील चमोली जिल्ह्यातील बामणी गावात उर्वशी मंदिर आहे. बद्रीनाथ धामपासून एक किलोमीटर अंतरावर हे मंदिर आहे. त्यामुळे बद्रीनाथ धामला जाणारे सर्व प्रवासी या मंदिरात जाऊन दर्शन घेतात. या मंदिरासंबंधित बऱ्याच पौराणिक कथा आहेत. नवरात्रीमध्ये या मंदिरात विशेष सोहळ्याचं आयोजन केलं आहे.

## केसरी 2'ची बॉक्स ऑफिसवर संथ सुरुवात

अक्षय कुमारचा बहुप्रतीक्षित 'केसरी चॅप्टर २' सिनेमा १८ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आला. हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर काय जादू करणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. करण सिंह त्यागी दिग्दर्शित या ऐतिहासिक सिनेमात प्रेक्षकांना कोर्टरुम ड्रामा पाहायला मिळत आहे. सध्या सिनेमाची बॉक्स ऑफिसवर संथ वाटचाल सुरू असल्याचं पाहायला मिळत आहे. 'सॅकनिल्क'ने दिलेल्या वृत्तानुसार सिनेमाला पहिल्या दिवशी केवळ ७.५ कोटींची कमाई करता आली आहे. तसेच चित्रपटाने आगाऊ बुकिंगमध्ये दोन कोटी रुपयांची कमाई केली आहे. आकडेवारीवरून असं दिसून येतं आहे की, 'केसरी चॅप्टर २' हा सिनेमा अक्षय कुमारच्या याआधीच्या 'स्काय फोर्स'च्या पहिल्या दिवसाच्या कमाईला मागे टाकण्यात अपयशी ठरला आहे. कारण, जानेवारी महिन्यात प्रदर्शित झालेल्या 'स्काय फोर्स' सिनेमाने पहिल्या दिवशीच १२.५ कोटींचा गल्ला जमावला होता. यावरून 'केसरी चॅप्टर २' सिनेमाच्या पहिल्या दिवसाच्या बॉक्स ऑफिस कलेक्शनची सुरुवात फारशी चांगली झालेली नाही.

## आयशाने दिलं चांगलंच उत्तर

बऱ्याच काळानंतर 'वाँटेड' फेम अभिनेत्री आयशा टाकिया काही दिवसांपूर्वी मुंबई विमानतळावर दिसली होती. यादरम्यानचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण आयशाच्या लूकवरून लोकांनी तिला ट्रोल केलं. "प्लास्टिक सर्जरी करून हिने स्वतःचा चेहरा बिघडवला', अशा आशयाच्या अनेक प्रतिक्रिया लोकांनी तिच्या व्हिडीओवर दिल्या होत्या. एवढंच नाहीतर लोकांनी तिला शरीर रचनेवरून ट्रोल केलं होतं. मात्र आता ट्रोलर्सला आयशाने चांगलंच उत्तर दिलं आहे.अभिनेत्री आयशा टाकियाने ट्रोल झाल्यानंतर सोशल मीडियावर भलीमोठी पोस्ट लिहिली आहे. आयशा म्हणाली, "मला हे सांगण्याची गरज आहे. दोन दिवसांपूर्वी माझ्या कुटुंबात मेडिकल इमरजेंसी असल्यामुळे गोव्याला निघाले होते. माझी बहीण हॉस्पिटलमध्ये आहे. यादरम्यान मला विमानतळावर काही पापाराझींना थांबवलं. त्यामुळे काही वेळात मी पापाराझींसाठी पोझ दिल्या. पण आपल्या देशात माझ्या लूकवर बोलण्याशिवाय इतर कोणतेही महत्त्वाचे मुद्दे नाहीत, असं मला वाटतं. अनेक जण बेताल मतं मांडत आहेत. मला कसं दिसायला पाहिजे होतं आणि कसं नाही याविषयी बोललं जात आहे. पण मला कुठलाही चित्रपट करण्यात किंवा पुन्हा कमबॅक करण्यात अजिबात रस नाही.



## तर लोक थिएटर जाळून टाकतील

अरविंद स्वामी व मनीषा कोईराला यांची प्रमुख भूमिका असलेला 'बॉम्बे' हा चित्रपट १९९५ साली प्रदर्शित झाला. प्रसिद्ध दिग्दर्शक मणिरत्नम यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते, तर राजीव मेनन यांनी या चित्रपटाचे शूटिंग केले होते. आता नुकतीच राजीव मेनन यांनी O२ इंडिया या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत राजीव मेनन म्हणाले, "बॉम्बे सारखा चित्रपट आज बनवला जाऊ शकत नाही. भारतातील परिस्थिती अस्थिर आहे. लोक विरोध करतात. धर्म हा मोठा मुद्दा बनला आहे. मला वाटत नाही की तुम्ही 'बॉम्बे'सारखा चित्रपट आता बनवू शकता. तो थिएटरमध्ये प्रदर्शित करू शकता. असे चित्रपट आता प्रदर्शित केले तर लोक थिएटर जाळून टाकतील.

गेल्या २५-३० वर्षांत भारतातील सहिष्णुता कमी झाली आहे. "दिग्दर्शक मणिरत्नम यांनी चित्रपटात हिंसाचाराच्या सीनसाठी ए आर रहमान यांनी रचलेल्या संगीताचा वापर केला. यावर बोलताना राजीव मेनन म्हणाले, "चित्रपटात जी हिंसाचाराची दृश्ये होती, त्यासाठी ए आर रेहमानचे संगीत आहे. ते सीन वेदनादायक होते, त्याप्रमाणेच संगीतही वेदनादायक होते. त्यामध्ये ढोल वाजल्याचा किंवा व्हायोलिनचा आवाज येत नाही. हिंसाचारातील वेदना त्या संगीतातून जाणवते.राजीव मेनन म्हणाले, "शहर जळत होतं, इतर कोणी त्या सीनच्या पार्श्वभूमीसाठी वेगळं संगीत निवडलं असतं, पण मणिरत्नम यांनी एक आई तिच्या मुलाला शोधत आहे, या भावनेचा विचार करून संगीत निवडले. ते अंगाई गीत होते.



## महिनाभरातच धनश्री दिली आनंदाची बातमी

गेल्या काही महिन्यांपासून भारताचा क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि धनश्री वर्मा यांचा घटस्फोट होणार असे बोलले जात होते. अखेर गेल्या महिन्यात २० मार्च रोजी त्यांचे नाते संपुष्टात आले. मुंबईतील वांद्रे कौटुंबिक न्यायालयामध्ये त्यांच्या घटस्फोटाची सुनावणी झाली. २२ डिसेंबर २०२० रोजी युजवेंद्र आणि धनश्री लग्नाच्या बेडीत अडकले होते. घटस्फोट घेतल्यानंतर धनश्री तिच्या करिअरवर लक्ष केंद्रित करताना दिसत आहे. धनश्री सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. सोशल मीडियावर ती तिचे अनेक फोटो व व्हिडीओ शेअर करत चाहत्यांच्या संपर्कात राहत असते. धनश्री उत्तम नृत्यांगणा आहे आणि तिच्या नृत्याचे अनेक व्हिडीओ ती सोशल मीडियावर शेअर करत असते. नृत्यांगणा असण्याबरोबरच धनश्री एक अभिनेत्री आहे आणि लवकरच ती सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. याबद्दल धनश्रीने स्वत:च माहिती दिली आहे.धनश्रीने स्वतः तिचे काही खास फोटो सोशल मीडियावर शेअर करत पहिला चित्रपट येणार असल्याचे म्हटलं आहे. धनश्री बऱ्याच दिवसांपासून हैदराबादमध्ये तिच्या आगामी चित्रपटाचे चित्रीकरण करत होती. याच चित्रीकरणाचे आणि टीमचे काही खास क्षण तिने पोस्टद्वारे शेअर केले आहेत. ती ज्येष्ठ चित्रपट निर्माते दिल राजू यांच्या प्रॉडक्शनच्या आगामी चित्रपटातून मोठ्या पडद्यावर एन्ट्री करणार आहे. या पोस्टमध्ये धनश्रीने असं म्हटलं आहे की, "माझा पहिला आणि खास चित्रपट. पहिला चित्रपट पूर्ण केल्याची भावना काही वेगळीच असते. यासाठी मी खूप उत्साहित आणि चिंताग्रस्त आहे. माझ्या सुपर टीम आणि दिल राजू प्रॉडक्शनबरोबर खूप छान वेळ गेला. लवकरच चित्रपटगृहात भेटू.

# वैभव सूर्यवंशी बाद होताच रडला!

## वादळी खेळीनंतर ऋषभ पंतने असं केलं आऊट

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**१४ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आयपीएल पदार्पणताच षटकार लगावत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. आयपीएल लिलावात वैभवला राजस्थान रॉयल्सने १.१ कोटींना संघात सामील केलं, पण त्याला पदार्पणाची संधी कधी देणार यावर सर्वांच्या नजरा होत्या. अखेरीस वैभवला राजस्थानने लखनौविरूद्ध सामन्यात पदार्पणाची संधी दिली आणि त्याने या संधीचा फायदा करून घेत वादळी खेळी केली. पण बाद झाल्यानंतर तो माघारी परतताना रडताना दिसला.**



संजू सॅमसन दुखापतीमुळे संघाबाहेर असल्याने वैभव सूर्यवंशीला या सामन्यात पदार्पणाची संधी मिळाली. वैभवने वयाच्या १४व्या वर्षी आयपीएलमध्ये पदार्पण केले. आयपीएलमध्ये सर्वात कमी वयात पदार्पण करणारा पहिला खेळाडू ठरला. यासह पहिल्याच सामन्यात सर्वांच्या नजरा साहजिकच वैभववर होत्या आणि त्याने पहिल्याच चेंडूवर षटकार लगावत त्याने सर्वांची मनं जिंकली.वैभवच्या षटकाराने सर्वांनाच धक्का दिला. वयाच्या १४ व्या वर्षी पदार्पण करणाऱ्या फलंदाजाकडून, तेही आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भरपूर अनुभव असलेल्या शार्दुल ठाकूरविरुद्ध, पहिल्याच चेंडूवर असा फटका मारण्याची अपेक्षा कोणालाही नव्हती. यासह, तो आयपीएलमध्ये षटकार मारणारा सर्वात तरुण फलंदाज बनला.पुढच्याच षटकात त्याने अवेश खानच्या चेंडूला लॉन्ग ऑनच्या बाहेर षटकार लगावला. आयपीएलमधील हा त्याचा फक्त तिसरा चेंडू होता. यानंतर फिरकीपटू आल्यावर वैभवचा डिफेन्सही पाहण्याची संधी मिळाली. संपूर्ण सामन्यात वैभवने फटकेबाजी आणि सावध फलंदाजीचा योग्य मेळ साधला आणि अजून एक चांगला क्रिकेटपटू तयार होत असल्याची त्याने हमी दिली. वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल यांनी संघाला कमालीची सुरूवात करून दिली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ८५ धावांची भागीदारी केली होती. ९व्या षटकात एडन मारक्रम फलंदाजीला आला आणि चौथ्या चेंडूवर ऋषभ पंतने वैभवला स्टम्पिंग करत बाद केलं. यासह वैभवची महत्त्वपूर्ण वादळी खेळीला पूर्णविराम लागला. वैभवने पदार्पणात २० चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ३४ धावांची खेळी केली. पण बाद झाल्यानंतर तो माघारी परतताना आपले अश्रू पुसताना दिसला. त्याच्या रडतानाचे फोटो, व्हीडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.वैभव सूर्यवंशी...

### इम्पॅक्ट प्लेअर फलंदाजीला उतरला

वैभवने त्याच्या आयपीएल कारकिर्दीच्या पहिल्याच चेंडूवर शानदार षटकार मारून क्रिकेट जगताला आश्चर्यचकित केले आहे. राजस्थानच्या घरच्या मैदानावर म्हणजेच जयपूरमध्ये लखनौ सुपर जायंट्स विरुद्ध सुरू असलेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सने १४ वर्षे आणि २३ दिवसांच्या वैभव सूर्यवंशीला पदार्पणाची संधी दिली. यासह तो आयपीएलच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू बनला. त्याने प्रयास रे बर्मनचा विक्रम मोडला. ज्याने १६ वर्षे १५७ दिवस वय असताना बंगळुरूसाठी पदार्पण केले. पण वैभव फक्त हा विक्रम मोडून समाधानी नव्हता. त्याने आपल्या फलंदाजीने सर्वांना प्रभावित केलं आहे.वैभव सूर्यवंशी इम्पॅक्ट प्लेअर म्हणून फलंदाजीला उतरला. पहिलं षटक शार्दुल ठाकूरने टाकलं आणि पहिले तीन चेंडू यशस्वी जैस्वालने खेळले. चौथ्या चेंडूवर वैभवला संधी मिळाली.

१४ वर्षीय भारतीय फलंदाजाने राजस्थान रॉयल्सकडून आयपीएलमध्ये पदार्पण केले. पदार्पणातील पहिल्याच चेंडूवर त्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. वैभव सूर्यवंशी १४ वर्षाचा मुलगा असल्याने त्याच्यावर सर्वांच्या नजरा होत्या. तो आयपीएलमध्ये कसा खेळणार याची सर्वांनाच उत्सुकता होती आणि त्याने सर्वांनाच सुखद धक्का दिला. त्याने पहिल्याच चेंडूवर षटकार लगावत आयपीएलमध्ये आपल्या आगमनाचा डंका वाजवला आहे. वैभव सूर्यवंशीने वयाच्या १४ व्या वर्षी क्रिकेटच्या जगात इतिहास रचला आहे. आयपीएल लिलावाच्या इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू ठरलेल्या वैभव वय वर्ष केवळ १४ वर्षे आणि २७ दिवस असताना आयपीएलमध्ये पदार्पण करून मोठा पराक्रम केला आहे.

---

# इशांत शर्मा आशुतोष शर्मावर संतापला

## इशांत शर्मा आणि आशुतोष शर्मा या खेळाडूंमध्ये वादावादी

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**गुजरातच्या संघाने घरच्या मैदानावर दिल्ली कॅपिटल्सचा पराभव केला आहे. या विजयासह गुजरातचा संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानी पोहोचला आहे. या सामन्यात दिल्लीचा मिचेल स्टार्क अपयशी ठरला तर गुजरातच्या जोस बटलरने वादळी खेळी करत संघाचा विजय निश्चित केला.**



पण दरम्यान या सामन्यात आशुतोष शर्मा आणि इशांत शर्मा यांच्यात वाद पाहायला मिळाला. अहमदाबादच्या मैदानावर झालेल्या या सामन्यात सर्वच खेळाडू गरमीमुळे त्रासले होते. इशांत शर्माला गरमीमुळे फार त्रास झालेला दिसला. गरमीमुळे धापा टाकत अक्षरशः इशांत शर्मा मैदानाबाहेर बसलेला दिसला. तर अक्षर पटेल आणि पंची गरमीमुळे वैतागलेले दिसले. पण यादरम्यान इशांत शर्मा पुन्हा एक षटक टाकण्यासाठी मैदानावर आला आणि त्याने चांगली गोलंदाजी केली.दिल्ली कॅपिटल्सने या सामन्यात प्रथम फलंदाजी केली आणि त्यांच्या फलंदाजांनी शानदार कामगिरी करत संघाला चांगल्या धावसंख्येपर्यंत पोहोचवले. यामध्ये मधल्या फळीतील फलंदाज आशुतोष शर्माने महत्त्वाची भूमिका बजावली, ज्याने शेवटच्या षटकात तुफानी खेळी केली. पण यादरम्यान, इशांत शर्माच्या एका चेंडूवर असं काहीतरी घडलं, ज्यामुळे गुजरात टायटन्सचा वेगवान गोलंदाज संतापला.दिल्लीच्या डावाच्या १९ व्या षटकात ही घटना घडली. या

### गरमीमुळे वैतागला इशांत शर्मा

त्यामुळे आशुतोष शर्मा इशांतला दाखवत राहिला की चेंडू त्याच्या बॅटला लागला नाही तर त्याच्या खांद्याला लागला आणि तो यष्टीरक्षकाकडे गेला. हा वाद फार काळ चालला नाही आणि गरमीमुळे वैतागलेला इशांत शर्मा मैदानाबाहेर गेला.यानंतर, रिप्लेमध्येही स्पष्ट झालं की आशुतोष खरं बोलत होता आणि चेंडू त्याच्या खांद्यावर लागला होता.

षटकाच्या चौथ्या चेंडूवर इशांतने फलंदाज डोवोवन फरेराला बाद केलं. त्यानंतर षटकाच्या शेवटच्या चेंडूवर आशुतोष शर्माविरुद्ध झेल घेण्यासाठी अपील करण्यात आले, पण पंचांनी त्यांना नाबाद घोषित केले. गुजरातकडे रिव्ह्यू नसल्याने डीआरएस घेता आला नाही. त्यामुळे इशांतला त्याच्या भावनांवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि तो थेट आशुतोषकडे गेला आणि त्याच्याकडे बोट दाखवत रागाने काहीतरी बोलताना दिसला. दरम्यान इशांत शर्मा त्याला शिव्या घालतानाही दिसत होता, पण नेमकं त्यांच्यात काय बोलणं झालं हे समोर आलं नाही.इशांत शर्मा त्याच्यावर संतापत असताना आशुतोषने आपला संयम गमावला नाही आणि वरिष्ठ खेळाडूचा आदर करत शांत राहिला. खरंतर आशुतोष शर्माच्या खांद्याला चेंडू लागून उडाला होता.